May-2022 E-ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

International Research Fellows Association's

# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

Peer Reviewed, Referred & Indexed Journal

Issue 295

## Multidisciplinary Issue



RESEARCH JOURNEY

Chief Editor -
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV's Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

Executive Editors :
Dr. Tejesh Beldar, Nashikroad (English)
Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)
Mrs. Bharati Sonawane, Bhusawal (Marathi)
Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

May-2022 E-ISSN : 2348-7143

International Research Fellows Association's

# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

Peer Reviewed, Referred & Indexed Journal

Issue-295

## Multidisciplinary Issue

**Chief Editor -**
Dr. Dhanraj T. Dhangar.
**Assist. Prof. (Marathi)**
**MGV's Arts & Commerce College,**
**Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA**

**Executive Editors :**
Dr. Tejesh Beldar, **Nashikroad (English)**
Dr. Gajanan Wankhede, **Kinwat (Hindi)**
Mrs. Bharati Sonawane, **Bhusawal (Marathi)**
Dr. Rajay Pawar, **Goa (Konkani)**

*Our Editors have reviewed papers with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responsible, answerable and accountable for their content, citation of sources and the accuracy of their references and bibliographies/references. Editor in chief or the Editorial Board cannot be held responsible for any lacks or possible violations of third parties' rights. Any legal issue related to it will be considered in Yeola, Nashik (MS) jurisdiction only.*

*- Chief & Executive Editor*

SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS

For Details Visit To : **www.researchjourney.net**

*Cover Photo : Gujarat Titans win IPL Final by 7 vickets. (Source-Internet)

© All rights reserved with the authors & publisher **Price : Rs. 1000/-**

# महाकवी वामनदादा कर्डक यांच्या निवडक गाण्यांचे अध्ययन

**प्रा. अशोक एस. जाधव**
संगीत विभाग प्रमुख
महिलारत्न पुष्पाताई हिरे कला, विज्ञान व वाणिज्य
महिला महाविद्यालय,मालेगाव कॅम्प, जि.नाशिक - ४२३१०५
ई-मेल – ashokjadhav1973@rediffmail.com
मोबाईल - ९३७१९२०६६६

**सारांश -**

महाकवी वामनदादा कर्डक यांनी त्यांचे प्रेरणास्थान असलेल्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर खूप मोठ्या संख्येने गाणी बनविली आहेत.वामनदादांनी बाबासाहेबांच्या कार्य कर्तृत्वावर व बाबासाहेबांचे विचार समाजात पोचविण्यासाठी केलेले प्रचंड लिखाण बघू जाता असे लिखाण हे क्वचितच आत्तापर्यंत कोणी कोण्या महापुरुष्यावर केले असेल इतके प्रचंड आहे. यातून वामनदादांचा बाबासाहेबांच्या शिकवणुकीवरील प्रगाढ विश्वास दिसून येतो. वामनदादांनी विविध विषयांवर हजारो गीते लिहिलेली आहेत, व त्यांची सर्व गीते ही गायिल्या जाणारी गीते म्हणजेच गाणी आहेत.गायिल्या जाणाऱ्या गीतांबाबत डॉ.यशवंत मनोहर लिहितात की,"गीत हा एक कविता प्रकार आहे आणि तो गेय म्हणजे गायिला जाणारा कविता प्रकार आहे.त्यामुळे गझल या कविता प्रकाराप्रमाणेच गीत हा कविता प्रकारही अत्यंत लोकप्रिय आहे.भारूड,लावण्या,पोवाडे,गझल,नाट्यपदे हे सर्व गायिले जाणारे कविताप्रकारच आहेत.गीतापासून भावकवितेपर्यंत आणि विचार कवितेपर्यंत कवितेचा वेगवेगळ्या रूपात आविष्कार होतो.हायकू,चारोळी,वात्रटिका इथपासून खंडकाव्यापर्यंत आणि पुढे महाकाव्यापर्यंत अशा असंख्य रूपांमधून कविता साकार होते.यातले काही कविता प्रकारच गाता येतात.गीत हेही या गायिल्या जाणाऱ्या कविता प्रकारातच अंतर्भूत होते." १ आज पुस्तक रूपाने हजारोंच्या संख्येने उपलब्ध असलेली वामनदादांची गीते ही केवळ गीते नाहीत तर ती गाणीच आहेत.जी गीते गायली जातात ती गाणी असतात.कारण, गीतांची रचनाच मुळात गाण्यासाठी केलेली असते.गीत लिहीत असतानाच रचनाकाराच्या डोक्यात कोणतीतरी सांगीतिक चाल असते,त्या चालीचा एखादा विशिष्ट ताल असतो,त्याची एक लय असते,आणि ह्या लयबद्ध चालीच्या हिंदोळ्यावरच रचनाकाराचे गीत आकाराला येत असते.जेंव्हा कोणी कलावंत मी गीत लिहिले आहे असे म्हणतो तेंव्हा त्याचा अर्थ हा असतो की त्याने कोणतीतरी सांगीतिक चाल मनात धरून व त्या चालीला अनुरूप असा ताल तसेच त्या तालाची लय निश्चित करून त्याने गीत रचना केलेली आहे.म्हणजेच, त्याने सरळ सरळ गाणेच तयार केलेले आहे असा त्याचा स्पष्ट अर्थ होतो. गीताचा जन्म हा सांगीतिक चालीसह झालेला असतो.गीत आहे म्हणजे त्याला सांगीतिक चाल अथवा धून आहे हे त्याचे स्वयंस्पष्ट तत्व आहे.यावरून हे अगदी स्पष्ट होते की वामनदादांनी हजारोंच्या संख्येने गीते लिहिली आहेत म्हणजेच त्यांनी हजारोंच्या संख्येने सरळ सरळ गाणीच बनविली आहेत.त्यामुळे, मुळात गायक व संगीतकार असलेल्या वामनदादांनी केवळ न गाता येणाऱ्या कविता रचल्या नाहीत तर त्यांनी प्रकर्षाने केवळ गाणीच बनविलीत व गायलीत हे स्पष्ट होते.

**प्रस्तावना -**

वामनदादांनी त्यांच्या कार्यकाळामध्ये आंबेडकरी चळवळीची हजारो गाणी लिहिलीत,संगीतबद्ध केलीत व गायलीत.आंबेडकरी चळवळ हेच जीवनाचे उद्दिष्ट मानून वामनदादांनी गाण्यांच्या रचना केल्यात.१४ ऑक्टोबर १९५६ रोजी बाबासाहेबांनी हिंदू धर्माचा त्याग करून नागपूर येथे लाखो अनुयायांसह बुद्ध धम्माची दीक्षा घेतली.बुद्ध धम्माचा स्वीकार केला.या ठिकाणाला आज दीक्षाभूमी असे संबोधले जाते.या धम्मदीक्षा

सोहळयाला वामनदादा उपस्थित राहू शकले नाहीत त्याबाबत ते लिहितात,"आईचे पाय हीच माझी दीक्षाभूमी होती.आईचे दर्शन हाच माझा दीक्षा समारंभ होता.नागपूरला जायला पैसे तरी कुठं होते?" २ पुढे बाबासाहेबांचे महापरिनिर्वाण झाले त्याच दिवशी वामनदादांनी बुद्ध धम्माची दीक्षा घेतली याबाबत वामनदादा सांगतात की,"सहा डिसेंबर एकोणीसशे छप्पनला बाबांच्या जळत्या चितेसमोर दादासाहेब गायकवाडांच्यासह लाखो लोकांनी दीक्षा घेतली.त्यात मीही होतो." ३ भारतामधून लुप्त होण्याच्या मार्गावर असलेल्या बुद्ध धम्माचे बाबासाहेबांनी भारतामध्ये पुनरुज्जीवन केले.या घटनेला धम्मचक्र प्रवर्तन असे म्हटले जाते.बाबासाहेबांनी केलेल्या धम्मचक्र प्रवर्तनाच्या घटनेला शिरोधार्य मानून तसेच स्वतःच्या बुद्धीच्या कसोटीवर तपासून पाहून वामनदादांनीसुद्धा बुद्ध धम्माचा अंगीकार केला.बाबासाहेबांनी प्रतिपादन केलेल्या प्रत्येक बाबींना वामनदादांनी आपल्या चळवळीमध्ये अग्रभागी ठेऊन समाज प्रबोधनाचे कार्य केले.वामनदादांनी बाबासाहेब,बुद्ध या महामानवांच्या विचारांखेरीज अनेक विषयांवर गाण्यांची निर्मिती केली. वामनदादांनी, बाबासाहेब, बुद्ध, राष्ट्र, निसर्ग, शेती, समाज, प्रेम, राजकारण, शिक्षण इ. विषयांवर विपुल गाणी लिहिलीत, संगीतबद्ध केलीत व गायलीत.त्यांच्या काळातील जनतेस व आजदेखील बहुसंख्य लोकांना वामनदादांची विविध विषयावरची अनेक गाणी माहीत आहेत. वामनदादांच्या ह्या चौफेर लिखाणाचा व त्यांच्या गाण्यांचा प्रचंड धडाका होता.त्यांच्या लेखणीतून पावसाच्या सरसर चिंब धारांप्रमाणे शब्दांचा पाऊस पडायचा.पावसाच्या सोबतीला जसे ढगांच्या गडगडाटाचे नैसर्गिक संगीत अंतर्भूत अथवा अंतर्निहित असते अगदी त्याच धर्तीवर वामनदादांचे गीत हे कागदावर उतरत असतानाच शब्दांबरोबरच त्या गीताची सांगीतिक चाल देखील अवतरायची आणि वामनदादांच्या नैसर्गिक गाण्यांचा जन्म व्हायचा. थोडक्यात, कलेच्या पातळीवर गीत आणि संगीताचा एकत्रित मिलाप होऊन सरळ गाणेच निर्माण व्हायचे.वामनदादा हे इतक्या नैसर्गिक प्रतिभेचे व संपन्न कलावंत होते. वामनदादांनी रचलेल्या अशाच काही निवडक व सर्वांगसुंदर गाण्यांचा अध्ययनात्मक आढावा पुढील प्रमाणे.

**वामनदादा कर्डक यांची तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्यावरील गाणी -**

वामनदादा हे मोठ्या दिलदारपणे सांगतात की बाबासाहेबांमुळे आम्हाला बुद्ध मिळाले.बुद्धांच्या शिकवणीने केवळ आमचे म्हणजे दीनजनांचेच नव्हे तर समस्त विश्वातील मानव प्राण्यांच्या जीवनाचे कल्याणच होणार आहे.याबाबत प्रा.डॉ.सागर जाधव संपादकीयमध्ये लिहितात की,"भारतीय संविधानाच्या माध्यमातूनच आणि हे संविधान प्रामाणिकपणे राबविले गेले तरच भारतीयांची उन्नती होईल हे देखील बाबासाहेबांनी सांगून ठेवलेले आहे.डॉ.बाबासाहेबांनी दिलेल्या महामार्गाचा विचार जनसामान्यांपर्यंत पेरण्याचे कार्य आपण करीत आहोत याची ग्वाही देतांना वामनदादा म्हणतात,

वामन तुझ्याही गायनात आता
मुखरीत झाली गौतमाची गाथा
लेखणी भीमाची तुझ्याही मुखाने
गौतमाचे गाणे इथे गात आहे. ४

बाबासाहेबांनी दिलेला बुद्धांचा विचार स्वीकारून समाज जागृतीस्तव झटणाऱ्या वामनदादांच्या गाण्याच्या वरील ओळी बुद्धाचा कल्याणमार्ग मोठ्या जबाबदारीने आळवतात.

वामनदादांनी बुद्धांच्या करुणामयी मार्गाचे वर्णन 'बुद्धं सरणं गच्छामि' ५ ह्या पुढील गाण्यात खूप मधुरतेने केले आहे.ह्या गाण्याची शब्दरचना,त्यातील शांततेचा भाव व गाण्याद्वारे दिलेला संदेश ह्या सर्व बाबी इतक्या

उत्कट आहेत की हे गाणे म्हणजे संपूर्ण मानव प्राण्यांसाठी मार्गदर्शक व प्रेरणेचा स्रोत ठरावे.ह्या गाण्याच्या आशयातून वामनदादांनी बुद्धाच्या करुणामयी मार्गाचा उदात्त विचार अत्यंत सोप्या व साध्या पद्धतीने मांडला आहे.हे गाणे वामनदादांच्या एकूणच संगीत रत्नांपैकी एक मोलाचे रत्न आहे.

त्रीसरणाची मंगल वाणी,घुमते मंगल धामी

'बुद्धं सरणं गच्छामि,धम्मं सरणं गच्छामि

संघं सरणं गच्छामि...॥धृ॥

एक संत असा कुलवंत
कुलवंत आणि शीलवंत
शीलवंताची साथ मिळाली
अखेरच्या मुक्कामी...॥१॥

सर्वांस मिळावा वाटा
असा ज्ञान धनाचा साठा
ठेउनी गेला याच ठिकाणी
उभ्या जगाचा स्वामी...॥२॥

ना शोध कुणाचा उसना
दुःखाचे कारण तृष्णा
तोड तयावर सांगून गेला
महान अंतरयामी ...॥३॥

गाऊन शीलाची गाथा
जन म्हणती गाता गाता
इथेच नमतो माथा आता
ज्ञान दुजे कुचकामी...॥४॥

आली रे संधी नामी
सांगीतले वामनला मी
उचल पोतडी पंचशीलाची
येईल अपुल्या कामी...॥५॥

कवी,गीतकार अथवा प्रतिभासंपन्न साहित्यकार म्हणून वामनदादांची ही कलाकृती अत्यंत श्रेष्ठ आहे.त्यांनी ह्या गाण्यात बुद्धाच्या कल्याणकारी मार्गाचे वर्णन इतक्या आकर्षक व मुलायम पद्धतीने केले आहे की वाचनाची तृष्णा शमावी.शब्दांचा इतका गुळगुळीत प्रयोग केलेला आहे की वाचताना कुठेच खटकत नाही.गीतकार म्हणून वामनदादांची उंची ह्या गाण्याने नक्कीच वाढविलेली आहे.मिश्र भैरव रागात ह्या गाण्याची चाल बांधलेली असून सोबत केरवा तालाचा प्रवाही प्रयोग केलेला आहे.हे गाणे वामनदादांचे आवडते शिष्य श्रावण यशवंते यांच्या आवाजात ध्वनिमुद्रित केलेले असून अनेक वर्षांपासून लोकांच्या कानावर असून देखील आजही हे गाणे अवीट गोडीचे आहे.

**वामनदादा कर्डक यांची डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्यावरील गाणी -**

वामनदादांनी 'तुझ्यामुळे' ६ ह्या गाण्याद्वारे स्वतःला बाबासाहेबांच्या प्रेरणेतून चळवळीसाठी पुरते वाहून घेतल्याबाबतचे वर्णन केले आहे.आंबेडकरी चळवळ हा एकच ध्यास व श्वास मानून वामनदादांनी सबंध आयुष्यभर समाजोद्धाराचे गाणे गायिले.वामंदांचे गाणे संपूर्ण वाचून जरी काढले तरी त्यांची सखोल आंबेडकरी निष्ठा ठाशीवपणे प्रत्ययास येते.बाबासाहेबांच्या समाजसुधारणेच्या कार्याचे ओझे स्वयंप्रेरणेने स्वतःच्या खांद्यावर घेऊन समाजासाठी अहोरात्र झटण्याचे इतके प्रचंड कार्य वामनदादांनी केले आहे की ते बघून मनुष्य स्तिमीत व्हावा.

संसार सोडला मी,भीमा तुझ्यामुळे
परिवार सोडला मी,भीमा तुझ्यामुळे...||धृ||

घरचा आणि रुढीचा,माझ्या गळयातला
गळफास तोडला मी,भीमा तुझ्यामुळे...||१||

जाऊन तुझ्या पिलांच्या, कळपात राहिलो
माणूस जोडला मी, भीमा तुझ्यामुळे...||२||

माझ्या जिराईताचे, पाणीच रोखले
तो बांध फोडला मी,भीमा तुझ्यामुळे...||३||

बसवून सात कोटी, गेलास तू तरी
गाडा तो ओढला मी,भीमा तुझ्यामुळे...||४||

वामनपरी नादान मनूचा,वर्चस्व सांगणारा
इतिहास खोडला मी,भीमा तुझ्यामुळे...||५||

वरील गाण्याचा अर्थ हा स्वयंस्पष्ट आहे.सरळ व सोप्या भाषेत विषय मांडण्याची वामनदादांची विलक्षण प्रभावी अशी शैली आहे.गाणे लिहिताना वेगवेगळे विषय जेंव्हा गाण्यात अंतर्भूत केलेले असतात तेंव्हा त्या विषयांचे ज्ञान असल्या शिवाय त्या विषयांवर लिहिणे हे केवळ अशक्य असते.त्यामुळे वामनदादांचे चौफेर ज्ञान त्यांच्या गाण्यांच्या प्रत्येक ओळींतून अधोरेखित होताना दिसते.वामनदादा हे केवळ काहीतरी लिहिण्यासाठी कधीच लिहीत नव्हते. त्यांच्यावर समाज सुधारणेच्या कार्याचे ओझे होते.त्यांना बाबासाहेबांचा,बुद्धाचा विचार सांगणे क्रमप्राप्त होते.लोकांना आंबेडकरी चळवळ सांगत असताना बऱ्या वाईट ऐतिहासिक घटनांच्या नोंदी आपल्या गाण्यांत येण्यासाठी त्या ऐतिहासिक घटनांचा अभ्यास असणे सुद्धा जरुरीचे होते.त्यामुळे वामनदादांनी वाचन ,चिंतन व मनन करून प्रगल्भ व प्रभावशाली विचार आपल्या गाण्यांद्वारे भक्कमपणे मांडल्याचे दिसून येते. वरील गाण्यातून वामनदादांची समाजकार्याची तळमळ व त्यामागे केवळ बाबासाहेबांचीच प्रेरणा असल्याचे ह्या गाण्याच्या प्रत्येक ओळीतून स्पष्टपणे दिसते.

वामनदादांचे 'गौतमा' ७ हे पुढील गाणेसुद्धा अत्यंत महत्वाचे व विचार करायला भाग पाडणारे आहे.बाबासाहेबांच्या विचारांची पायधूळ आपल्या कंपाळी माळून तसेच बाबासाहेबांनी दिलेला बुद्धांचा विचार स्वीकारून समाजात वावरत असताना हे विचार कुठेतरी अडचणीचे ठरू लागतात.कारण,इतर सर्वसाधारण समाजातील लोकांचे वर्तन हे अत्यंत आडमुठे व एकमेकांच्या प्रगतीला बाधा आणणारे तसेच विषमतेचे वीष पेरणारे असल्यामुळे अशा निर्दयी लोकांसोबत जशास तसे या न्यायानेच वागणे बरे आहे.अन्यथा

बुद्धाच्या क्षमाशील विचारांनी जगणारांना हे जग सुखाने जगू देत नाही, ही उद्विग्नता वामनदादांनी ह्या गाण्यामधून खूप दमदारपणे मांडली आहे.

गौतमा गौतमा रे भीमा गौतमा
का न सोडून जावे सांगा तुम्हा...||धृ||

शील छेदी कुणी, प्राण छेदी इथे
पायी तुडवी आम्हाला चेंदी इथे
सांगता जा करा अधमाला क्षमा...||१||

वामनदादांची गाणी ही खऱ्या अर्थाने समाज प्रबोधनाची गाणी होती या अर्थाने हे गाणे प्रचंड ताकतीचे उदाहरण ठरावे. ह्या गाण्याद्वारे वामनदादांनी आपल्या आदर्शांनाच निर्वाणीचा प्रश्न केला आहे की ह्या निर्दयी जगात तुमची शिकवण ही माझ्यासारख्या सामान्य माणसाला जीवन जगताना उपयोगी पडणारी नाही.कारण,ह्या निष्ठूर जगात सहन करणाराला लोक छळतात आणि अन्यायाला प्रतिकार करणारांपासून दूर पळतात.त्यामुळे टोल्यास टोला हीच भाषा अशा नराधमांसोबत केली पाहिजे असा पोटतिडकीचा विचार वामनदादा ह्या गाण्यामधून मांडतात.बुद्ध आणि बाबासाहेबांना सोडून जाण्याची भाषा जाहीरपणे आपल्या गाण्यांद्वारे आत्तापर्यंत केवळ वामनदादांनी केली असावी.असा टोकाचा विचार वामनदादा अनुभवांच्या पार्श्वभूमीवर व्यक्त करीत असले तरी समस्त मानवांच्या कल्याणाचा विचार हयातभर आपल्या गाण्यांद्वारे मांडणाऱ्या वामनदादांनी बुद्ध आणि बाबासाहेबांचा मार्ग कधीच सोडला नाही इतकी प्रांजळ प्रज्ञा वामनदादांकडे होती.

ज्या व्यक्तीने आपले आयुष्य बाबासाहेब व बुद्धांनी दाखविलेल्या सम्यक मार्गानेच व्यतीत केलेले आहे केवळ त्याच व्यक्तीला बाबासाहेब व बुद्धांना प्रश्न करण्याचा नैतिक अधिकार प्राप्त होतो.वामनदादा हे आंबेडकरी निष्ठेचे अत्यंत ज्वलंत उदाहरण असून त्यांचे सबंध आयुष्य हे आंबेडकरमय आहे.वामनदादांनी जरी बुद्ध आणि बाबासाहेबांना प्रश्न केला असला तरी त्या प्रश्नामागे अज्ञानातून आलेली मग्रुरी नाही तर आपल्या प्रज्ञेच्या सम्यक जाणिवेतून प्रकटलेला तो सात्विक तसेच लटका संताप आहे हे सुद्धा स्पष्टपणे दिसून येते.

वामनदादांचे तथागत भगवान गौतम बुद्धांच्या तत्वज्ञावर आधारित व बाबासाहेबांच्या प्रेरणेतून फुललेले 'जात विचारी' ८ हे पुढील गाणेसुद्धा अत्यंत महत्वाचे आहे.

तथागताची झाली जी जनता छप्पन साली
तिलाच जात विचारी ही खुर्ची दिल्लीवाली...||धृ||

उघडून शीलाचे दालन करी पंचशीलाचे पालन
शील विसरली नाही जी निळ्या आभाळाखाली...||१||

१४ ऑक्टोबर १९५६ साली बाबासाहेबांनी आपल्या लाखो अनुयायांसह नागपूर येथे हिंदू धर्माचा त्याग करून बुद्ध धम्माची दीक्षा घेतली.याच दिवसापासून सर्व आंबेडकरी जनता हिंदू धर्माचा त्याग करून बुद्ध धम्म स्वीकारून एका नव्या परंतु वैज्ञानिक विचार प्रवाहाशी जोडली गेली.अशा नवबौध्द समाजाला येनकेन प्रकारे वेळोवेळी सरकारी पातळीवरून होणाऱ्या विविध सर्वेक्षणाच्या माध्यमातून जात विचारून अपमानित करीत असल्याचा आक्षेप वामनदादा त्यांच्या ह्या गाण्याद्वारे घेतात.वामनदादांची गाणी म्हणजे मधाचे पोळेच आहेत. दिसायला व वाचायला अत्यंत मधुर परंतु, अन्यायाविरुद्धच्या अंगारयुक्त आशयाने ओतप्रोत. वामनदादांच्या गाण्यांमध्ये दुःख आहे, जबाबदारीचे भान आहे, चीड आहे, वेदना आहे परंतु सर्व मानवप्राण्यांचे कल्याण व्हावे अशी मंगलमैत्रीयुक्त संवेदना देखील आहे.

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Issue - 295 : Multidisciplinary Issue
Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
May-2022

वामनदादांनी बाबासाहेबांवर तर प्रचंड गाणी बनविली आहेत.रक्ताच्या कणाकणात केवळ आंबेडकर घेऊन जगलेल्या वामनदादांनी बाबासाहेबांनी दाखविलेल्या शिका,संघटीत व्हा,संघर्ष करा ह्या उन्नतीच्या मार्गाचा प्रचार व प्रसार हयातभर त्यांच्या गाण्यांद्वारे केला.आंबेडकरी चळवळीच्या इतिहासाचे लेखन वामनदादांच्या नावाच्या उल्लेखाशिवाय कदापिही पूर्ण होणार नाही इतके मौल्यवान कार्य वामनदादांनी आंबेडकरी चळवळीसाठी केलेले आहे.

वामनदादांचे पुढील गाणे 'भीम वाणी जिथे जात आहे ते घराणे पुढे जात आहे ' ९ म्हणजे आंबेडकरी विचारांचे मंगलसूत्र ठरावे.बाबासाहेबांचे विचार धारण करून मार्गक्रमण करणारांचे कल्याण होत आहे आणि होणारच आहे अशी ठाम खात्री व आशावाद प्रसृत करणारे वामनदादांचे हे गाणे आहे.

भीम वाणी जिथे जात आहे
ते घराणे पुढे जात आहे ...||धृ||

भाकरीची जरी वाण आहे
पायरीची तरी जाण आहे
पायरीने पुढे जात आहे...||१||
ते घराणे पुढे जात आहे ...

आंबेडकरी समाजातील लोक गरीब असले, हलाखीचे जीवन जगणारे असले तरी ते स्वाभिमानी आहेत.लाचारी त्यांच्या रक्तात नाही.लाचारी पत्करून कोणत्याही स्तरापर्यंत जाऊन नैतिक अध:पतन करून घेणारे हे लोक नाहीत.कोणत्याही भक्कम पाठबळाशिवाय त्यांची प्रगति ही धिम्यागतीने जरी सुरु असली तरी ती नैतिकतेच्या मार्गानेच सुरु आहे आणि हे सर्व फक्त बाबासाहेबांच्या सम्यक विचार सरणीमुळे आहे असे खोल तत्वज्ञान वामनदादा त्यांच्या ह्या गाण्याद्वारे मांडतात. खरेतर हे प्रेरणा गीत आहे.कोणत्याही समाजातील प्रबुद्ध विचारसरणीच्या लोकांनी हे गाणे व ह्या गाण्यातील विचारभाव आत्मसात करून त्या विचारांप्रमाणे वाटचाल सुरु केली तर नैतिक प्रगति ही नक्कीच होणार आहे. आई,वडील ज्या प्रमाणे आपल्या लेकरांच्या प्रगतीसाठी त्यांना कोणती ना कोणती प्रेरणा शिकवून प्रगतीच्या मार्गावर आरूढ करण्यासाठी झटत असतात, अगदी तेच काम वामनदादांनी आंबेडकरी समाजातील सर्व लेकरांचे आई वडील होऊन केले आहे.

वामनदादांचे 'आम्ही तुझे संतान भीमा' १० हे पुढील गाणेही अत्यंत महत्वाचे आहे.

आम्ही तुझे संतान भीमा आम्ही तुझे संतान
तुझा वारसा पुढे न्यावया करू जीवाचे रान
भीमा आम्ही तुझे संतान... ||धृ||

जनहीत साधन दुःख निवारण पथ जीवन क्रांतीचा
धम्म तुझा अनमोल दीनांचा वाली ह्या धरतीचा
धम्म लाट ही उसळत ठेऊ सागर लाटे सामान...||१||
आम्ही तुझे संतान भीमा आम्ही तुझे संतान...

वामनदादा हे जसे बाबासाहेबांच्या उपकारांची जाण ठेऊन त्यांच्यावर स्तुतीसुमने उधळणारी गाणी लिहितात, तितक्याच ताकतीने आंबेडकरी जनतेचीसुद्धा जबाबदारी ते परखडपणे ह्या गाण्यातून मांडतात.वामनदादा ह्या गाण्यामधून विचार मांडतात की बाबासाहेब,आम्ही तुमची लेकरे आहोत,तुम्ही दाखविलेला मानव मुक्तीचा

E-ISSN : 2348-7143
May-2022

मार्गच आम्ही अविरतपणे चालत राहू,त्याचबरोबर तुम्ही दिलेला बुद्ध धम्म कसोशीने पाळून आम्ही आमचे जीवन संपन्न करू आणि स्वत:बरोबर इतरांच्याही कल्याणाचा आपण दिलेला विचार आम्ही जबाबदारीने अंगिकारू.ह्या गाण्याद्वारे खरेतर वामनदादांनी आंबेडकरी समाजाच्यावतीने बाबासाहेबांना हमी आहे दिलेली.हे गाणे वामनदादांनी आंबेडकरी विचारांच्या माणसांतील स्फुल्लिंग चेतविण्यासाठीच लिहिलेले आहे.प्रत्येक व्यक्तीला बाबासाहेबांच्या विचारांनुसार कार्य करणे क्रमप्राप्त असल्याबाबतची हमी हे गाणे देते. बाबासाहेबांच्या विचारांशी प्रामाणिक राहून केवळ बाबासाहेबांच्या वाटेने जाण्याचा निर्धार केलेल्या व त्या निर्धारानुसारच हजारो गाण्यांच्या माध्यमातून आंबेडकरी चळवळीला एका उंचीवर नेऊन ठेवणाऱ्या वामनदादांची थोरवी त्यामुळेच शब्दातीत आहे.

वामनदादांनी त्यांच्या आयुष्यात रचलेली हजारो गाणी बघू जाता त्यांनी खरे तर एका नव्या संगीत सृष्टीचाच आविष्कार केल्याचे दिसून येते व ती म्हणजे आंबेडकरी संगीत सृष्टी अथवा 'आंबेडकरी संगीत' होय.येणाऱ्या अनेक पिढ्या वामनदादांना ह्या आंबेडकरी संगीताचे जनक म्हणून निर्विवादपणे संबोधणार आहेत.

**निष्कर्ष**

१. वामनदादांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर व तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या क्रांतिकारी विचारांनी प्रेरीत समाजोद्धारासाठी हजारो गाणी लिहिली,संगीतबद्ध केली व स्वतःच प्रबोधनाच्या सांगीतिक कार्यक्रमांमधून गाऊन लोकप्रबोधन केले.
२. वामनदादांनी बाबासाहेब,बुद्ध या महापुरुषांच्या विचारांनी प्रेरीत गाण्यांशिवाय राष्ट्रभक्तीपर पुष्कळ गाणी बनविलीत.
३. वामनदादांनी स्त्रीप्रधान गाणीसुद्धा पुष्कळ बनविलीत.
४. वामनदादांनी निसर्गवर्णन असलेली निसर्ग गाणी मोठ्या संख्येने बनविलीत.
५. वामनदादांनी कष्टकऱ्यांच्या जीवनावर अनेक गाणी बनवून कष्टकऱ्यांचे दुःख जगाच्या वेशीवर टांगले.
६. वामनदादांनी स्वातंत्र्य,समता,बंधुता व न्याय ह्या भारतीय संविधानातील मूल्यावर आधारित अनेक गाणी बनवून लोकांमध्ये मूलभूत हक्कांबाबत जागृती केली.
७. वामनदादांनी शोषित,पीडित व अन्यायग्रस्त मानवी समाजाच्या व्यथा,वेदना कथन करणारी तसेच शोषितांना त्यांच्या दयनीय स्थितीतून वर काढण्यासाठी प्रेरणेचे बळ देणारी अनेक गाणी बनविलीत.
८. वामनदादांनी अनेक विषयांवर गाणी बनवून तळागाळातील माणसांचे जीवनमान उंचावण्यासाठी व त्यांना उभारी तसेच हिम्मत देण्याचे कार्य अव्याहतपणे केलेले आहे.
९. वामनदादांनी गरिबांचा,दुःखितांचा,पीडितांचा,शोषितांचा ,अन्यायग्रस्तांचा त्यांच्या गाण्यांतून सातत्याने कैवार घेऊन त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी व प्रगतीसाठी मार्गदर्शन केले आहे.
१०. वामनदादांची गाणी आंबेडकरी व इतरही गरीब जनतेच्या ज्वलंत प्रश्नांबरोबरच देशभक्तीला अत्यंत प्राधान्य देतात.
११. वामनदादांची गाणी दुःखितांच्या व्यथा व वेदनांवर फुंकर घालण्याचे काम करतात.

**संदर्भ ग्रंथ -**

१) डॉ.यशवंत मनोहर,आंबेडकरवादी महागीतकार : वामनदादा कर्डक,युगसाक्षी प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती - १४ एप्रिल २००५,पृष्ठ क्र. १२
२) वामन कर्डक,माझ्या जीवनाचं गाणं,शब्दांकन - प्रा.रविचंद्र हडसनकर, शब्ददान प्रकाशन, नांदेड,१४ एप्रिल २०१०, पृष्ठ क्र.२९

E-ISSN : 2348-7143
May-2022

३) वामन कर्डक,माझ्या जीवनाचं गाणं,शब्दांकन - प्रा.रविचंद्र हडसनकर, शब्ददान प्रकाशन,नांदेड,१४ एप्रिल २०१०,पृष्ठ क्र.२९

४) संपादक - माधवराव गायकवाड - प्रा.डॉ. सागर जाधव,महाकवी वामनदादा कर्डक : समग्र वाङ्मय, खंड - ३,आलोक - संबोधी प्रकाशन,यवतमाळ,प्रथम आवृत्ती - १४ एप्रिल २०१६,पृष्ठ क्र. ४० व ४१

५) संपादक - माधवराव गायकवाड - प्रा.डॉ. सागर जाधव,महाकवी वामनदादा कर्डक : समग्र वाङ्मय, खंड - ३,आलोक - संबोधी प्रकाशन,यवतमाळ,प्रथम आवृत्ती - १४ एप्रिल २०१६,पृष्ठ क्र. ७८

६) संपादक - माधवराव गायकवाड - प्रा.डॉ. सागर जाधव,महाकवी वामनदादा कर्डक : समग्र वाङ्मय, खंड - ३,आलोक - संबोधी प्रकाशन,यवतमाळ,प्रथम आवृत्ती - १४ एप्रिल २०१६,पृष्ठ क्र. २५७

७) संपादक - माधवराव गायकवाड - प्रा.डॉ. सागर जाधव,महाकवी वामनदादा कर्डक : समग्र वाङ्मय, खंड - ४,आलोक - संबोधी प्रकाशन,यवतमाळ,प्रथम आवृत्ती - १४ एप्रिल २०१६,पृष्ठ क्र. ४७०

८) संपादक - माधवराव गायकवाड - प्रा.डॉ. सागर जाधव,महाकवी वामनदादा कर्डक : समग्र वाङ्मय, खंड - ४,आलोक - संबोधी प्रकाशन,यवतमाळ,प्रथम आवृत्ती - १४ एप्रिल २०१६,पृष्ठ क्र. ४७१

९) संपादक - माधवराव गायकवाड - प्रा.डॉ. सागर जाधव,महाकवी वामनदादा कर्डक : समग्र वाङ्मय, खंड - ४,आलोक - संबोधी प्रकाशन,यवतमाळ,प्रथम आवृत्ती - १४ एप्रिल २०१६,पृष्ठ क्र. २२५

१०) संपादक - माधवराव गायकवाड - प्रा. सागर जाधव,महाकवी वामनदादा कर्डक : समग्र वाङ्मय, खंड - १,आलोक - संबोधी प्रकाशन,यवतमाळ,प्रथम आवृत्ती - १५ मे २०१०, पृष्ठ क्र. ४५४